महाराष्ट्र शासन
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
३, महापालिकामार्ग, टपालपेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१
www.dvet.gov.in; Email- desk८@dvet.gov.in ; दुरध्वनी क्र. ०२२-२२६२०६०४/२९३

क्रमांक: ०८/खाऔप्रंस/इरादापत्र/प्रसिध्दी पत्रक-२०२१/605
दिनांक: ०९/१२/२०२१

# प्रसिध्दीपत्रक

**कायमविना अनुदान तत्त्वावर नवीन खाजगी औ.प्र.संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औ.प्र.संस्थांत नवीन व्यवसाय/जादा तुकडी सुरु करणे, व्यवसाय बदल करण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने शासनाचे इरादापत्र (Letter of Intent-LOI) प्राप्त करण्याकरीता प्रस्ताव मागविणेबाबत.**

सन २०२२-२३ शैक्षणिक सत्रापासुन कायमविना अनुदान तत्त्वावर नवीन खाजगी औ.प्र.संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औ.प्र.संस्थांत नवीन व्यवसाय/जादा तुकडी सुरु करणे, व्यवसाय बदल करण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने शासनाचे इरादापत्र (Letter of Intent-LOI) प्राप्त करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०९,डिसेंबर, २०२१ पासून मागविण्यात येत असून अर्ज करण्याची सुविधा खालील संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता संकेतस्थळ:** https://vti.dvet.gov.in

**ऑनलाईन अर्ज करण्याची सुरूवात :** ९ डिसेंबर, २०२१

**अर्ज करण्याची अंतीम मुदत:** दिनांक ३१ डिसेंबर, २०२१

ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती, शुल्क व व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास आवश्यक मानके संचालनालयाच्या वरील अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(एल.डब्ल्यु.येडे)
कार्यासन अधिकारी

महाराष्ट्र शासन
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिकामार्ग, टपालपेटीक्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१
www.dvet.gov.in; Email- desk८@dvet.gov.in ; दुरध्वनी क्र. ०२२-२२६२०६०४/२९३

क्रमांक: ०८/खाऔप्रंस/इरादापत्र/प्रस्ताव-२०२१ / ६११
दिनांक: १५/११/२०२१

प्रति,

सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपुर/

विषय:-कायमविना अनुदान तत्त्वावर नवीन खाजगी औ.प्र.संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकडी/व्यवसाय बदल करण्याकरिता शासनाचे इरादापत्र(LOI) प्राप्त करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल www.vti.gov.in सुरु करणेबाबत.

संदर्भ:-१.शासन पत्र क्र.व्हिओसी-२०१७/प्र.क्र.१५७/व्यशि-४ दि.१२/०६/२०२०
२.डिजीटी नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक DGT-११०१२/४/२०२१-O/o DIR (TC)
३. शासन पत्र क्र.आयटीआय-२०२१/प्र.क्र.११७/व्यशि-३ दि.९/१२/२०२१

उपरोक्त विषयी येथे नमुद करण्यात येते की, संदर्भ क्रमांक ०१ अन्वये शासनाने निश्चित करुन दिलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार सन २०२२-२३ करीता कायमविना अनुदान तत्त्वावर नवीन खाजगी औ.प्र.संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकडी वाढ/व्यवसाय बदल करण्याकरीता ऑनलाईन अर्ज करण्याचे संचालनालयाचे पोर्टल https://vti.dvet.gov.in ०१ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२१ या कालावधीत अर्जदारांना अर्ज करण्याकरीता सुरु ठेवण्यात आलेले होते.

संदर्भ क्रमांक २ अन्वये डिजीटी नवी दिल्ली यांचे दिनांक ०४.०८.२०२१ च्या पत्रानुसार नवीन औ.प्र.संस्थांना किमान ४ व्यवसाय अभ्यासक्रम व ८ तुकडया सुरु करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यातील किमान १ व्यवसाय अभियांत्रिकी, ०१ व्यवसाय बिगर अभियांत्रिकी व ०१ व्यवसाय न्यु एज/ Industry ४.० आवश्यक असल्याने काही संस्थाना सदर निकषानुसार अर्ज करता आला नाही. दि.०१ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२१ दरम्यान सन २०२२-२३ या करीता काही संस्थाना ऑनलाईन अर्ज करता न आल्याने संस्थाची सर्व तयारी असुन देखिल संस्थेला अर्ज करण्यास इच्छुक असुन पोर्टल बंद असल्याने अर्ज करु शकले नाही.

त्याअनुषंगाने विदयमान व खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थाना https://vti.dvet.gov.in या संकेतस्थळावर ऑन लाईन अर्ज करण्याकरिता दि.९/१२/२०२१ ते ३१/१२/२०२१ पर्यंत पुन्हा पोर्टल सुरु करण्यास शासनाने संदर्भ क्रमांक ३ अन्वये मान्यता दिली आहे.त्यानुसार पोर्टल सुरू करण्यात आले असुन आपल्या स्तरावरुन सदर बाबीस प्रसिध्दी देण्यात यावी.

Nikam
(नि.आ.निकम)
उपसंचालक

प्रत- १.सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,कार्यालय,
२.सर्व खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्थांना संबंधित प्रादेशिक कार्यालये यांचे मार्फत